## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची गुरुवार दि. २८ मे २००९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची बैठक गुरुवार दि. २८ मे २००८ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. सुभाष हजारे,भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ८) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| ९) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १०) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| ११) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १३) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १४) | कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १५) | श्री.अनिल देशमुख,निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाचे सचिव यांनी सर्व सन्माननीय उपस्थितांचे स्वागत केले.मा.मुख्य अधिकारी श्री.सुभाष हजारे, मुख्य लेखा अधिकारी श्री.तपासे व निवासी कार्यकारी अभियंता श्री.अनिल देशमुख यांनी आपापल्या पदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर मंडळाची पहिलीच बैठक असल्याने बैठकीमध्ये मा.सभापती यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले व त्या नंतर मा.सभापती यांच्या अनुमतीने पुढच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.१**

विषय - दि.१७/०२/०९ रोजी झालेल्या ११४ व ११५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मंडळाची दि.१७/२/०९ रोजी दुपारी २.०० वाजता झालेली ११४ वी अर्थसंकल्पीय बैठक व दुपारी ४.०० वाजता झालेली ११५ वी बैठकीच्या कार्यवृत्तांतावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होत असताना सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी बैठकीची कार्यसूची उशिरा मिळाल्याबद्दल नापसंती व्यक्त केली व असे सूचित केले की, बैठकीची कार्यसूची मंडळाच्या

सदस्यांना कमितकमी ७ दिवस आधी मिळणे आवश्यक आहे. या संदर्भात कार्यसूची उशिरा मिळाल्याबद्दल सचिव, निवासी कार्यकारी अभियंता यांनी दिलगिरी व्यक्त केली व यापुढे कार्यसूची कमितकमी ७ दिवस आधी सदस्यांना पाठविण्यात येईल असे सांगितले. या संदर्भात मा.सभापती यांनी यापुढे सन्मा.सदस्यांना बैठकीची कार्यसूची एक आठवडाभर आधी पाठविण्यात यावी, असे आदेश दिले.

कार्यवृत्तांतावर चर्चा होत असताना, सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी संक्रमण शिबीरामधील घुसखोरीबाबत काय कार्यवाही होत आहे व यास किती कालावधी लागणार आहे अशी विचारणा केली. या संदर्भात मंडळाचे सहमुख्य अधिकारी यांनी करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती दिली व ~~अ[illegible]~~ मुलुंड,मागाठाणे व सायन प्रतिक्षानगर व इतर या संक्रमण शिबीरामधील अंदाजे ५०० पेक्षा जास्त घुसखोरांना पोलीसांची मदत घेवून बाहेर काढण्यात आलेले आहे व सदर कार्यवाही यापुढेही चालू रहाणार आहे. परंतु, सर्व संक्रमण शिबीरामध्ये संपूर्णपणे घुसखोरी काढून टाकण्यासाठी निश्चित किती कालावधी लागेल हे सध्या सांगणे शक्य नाही असे सांगण्यात आले. संक्रमण शिबीरातील सर्वच घुसखोरांना काढण्यासाठी नियोजन करावे लागेल, तसेच मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीबाबत व्यवस्था करावी लागेल, असे सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले. त्यावरती बहुतांश सदस्यांनी तशा प्रकारचा प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना केली. तसेच सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी विधानसभा मतदार संघ निहाय उपलब्ध विशेष निधीच्या कामांना मार्च, एप्रिल या महिन्यामध्ये का मंजूरी दिलेली नाही,अशी विचारणा केली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, लोकसभा निवडणूकीमुळे आचारसंहिता ०२/०३/०९ तारखेपासून लागली असल्यामुळे मंडळाची बैठक मार्च व एप्रिल महिन्यामध्ये होणार नव्हती. तसेच उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती ज्या ठिकाणी तातडीने हाती घ्यावयाची आहे, अशा बजेटेड वर्ककरीता व काही इमारतींच्या पुनर्विकास कार्यक्रमांना मंजूरी देणे व इतर काही तातडीच्या कामांना मंजूरी देण्याकरीता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.यांच्या मंजूरीने मुख्य अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य अभियंता-२/प्रा., उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव)/म.न.पा., निवासी कार्यकारी अभियंता या अधिका-यांची मिळून एक समिती गठित करण्यात आली होती व सदर समितीने मार्च व एप्रिल या दोन महिन्यामध्ये दि.२६ मार्च ०९ व दि.२७ एप्रिल ०९ रोजी झालेल्या बैठकांमध्ये शासकीय निधीतून (बजेटेड वर्क) करावयाच्या तातडीच्या दुरुस्तीच्या कामांना प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. परंतु शासनाने उपलब्ध करुन दिलेला विशेष निधी हा मतदारसंघ निहाय असल्यामुळे व सदर निधीतून करावयाच्या कामांना मंजूरी देणे आचारसंहितेच्या काळात शक्य नव्हते व आचारसंहिता संपल्यानंतर सदस्यांनी अशा विशेष निधीतून करावयाच्या कामांची यादी या महिन्यातील नियोजीत बैठकीच्या आधी काही दिवसापूर्वी पाठविली असल्यामुळे सदर कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याकरीता प्रस्ताव या बैठकीमध्ये बाब क्र.११६.११ अंतर्गत सादर करण्यात आलेला आहे. तसेच ~~मंडळ अस्तित्वात~~ असल्यामुळे मुख्य अधिकारी यांना प्रशासकीय मान्यता देता येत नाही. या संदर्भात मा.सभापती यांनी देखील मा.मुख्य अधिकारी यांनी वरीलबाबत केलेल्या स्पष्टीकरणास सहमती दर्शविली व या बैठकीमध्ये विशेष निधीतून करावयाच्या अशा उर्वरित सर्व कामांना मंजूरी देवून सदर कामे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी तातडीने हाती घ्यावी, जेणे करुन पुढे होणा-या विधानसभा निवडणूकीच्या आधी सदर कामे पूर्ण होतील, याची दक्षता घ्यावी असे आदेश दिले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंडळाने दि.१७/२/०९ रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीमध्ये मंडळाचे सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पास मंजूरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने उपकरप्राप्त इमारतींच्या सर्वेक्षण कामाची सध्या काय प्रगती आहे, अशी विचारणा केली. यावर उपमुख्य अभियंता (द.), श्री.सेहगल यांनी दक्षिण परिमंडळातील एकूण ८८४१ उपकरप्राप्त इमारतींपैकी सर्वसाधारणपणे ९% इमारतींचे सर्वेक्षण झालेले आहे. सदर सर्वेक्षणाच्या कामामध्ये वेगवेगळया विभागाकडून माहिती संकलित करणे आवश्यक असल्यामुळे व त्यानंतर सदर माहिती इमारतनिहाय संगणकामध्ये डेटाएन्ट्री केली जाते आणि म्हणून या कामास सुरुवातीस थोडा कालावधी जास्त लागला परंतु या पुढे या कामास गती देण्यात येईल. तसेच उपमुख्य अभियंता (उ.), श्री.पटेल यांनी त्यांच्या उत्तर परिमंडळातील एकूण ७३५४ उपकरप्राप्त इमारतींपैकी एकूण ८७० इमारतींचे सर्वेक्षण करुन आवश्यक ती माहिती संकलित करण्याचे काम चालू आहे व त्या माहितीची संबंधित विभागीय अधिका-यांकडून तपासणी करुन संगणकामध्ये डेटाएन्ट्री करण्यात येईल,सदर कामाला गती देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. या संदर्भात मा.सभापती यांनी सदर सर्वेक्षणाच्या कामावरील प्रगती अतिशय कमी असून ह्या कामास गती देणे आवश्यक आहे, अशा संबंधित अधिका-यांना सूचना केल्या. तसेच त्यांनी असेही सूचित केले की, उपकरप्राप्त इमारतींच्या सर्वेक्षणाच्यासंदर्भात मंडळाने तयार केलेले सॉफ्टवेअर व आतापर्यंत झालेले काम याबाबतची माहिती देणारे प्रेझेंटेशन मंडळाच्या सदस्यांकरीता अयोजित करण्यात यावे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी याबाबत लवकरच वेळ निश्चीत करुन प्रेझेंटेशन आयोजित करण्यात येईल, असे सांगितले. मा.सभापती यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, मागिल बैठकांमध्ये वेळोवेळी चर्चा होवून सन्मा.सदस्यांनी अतिधोकादायक इमारती खाली करण्यासाठी देण्यात येणा-या व्हेकेशन नोटीस या लेटरफॉर्ममध्ये असतात त्या बुकलेट/फोटोपास या धर्तीवर तयार करुन ते दस्तऐवज जास्त काळ सुरक्षित रहातील अशा दृष्टीने तयार कराव्यात असे सूचित करण्यात आले होते. परंतु अद्याप यावरती कोणतीही कार्यवाही झालेली नाही, याबाबत योग्य ती कार्यवाही सहमुख्य अधिकारी व निवासी कार्यकारी अभियंता यांनी संयुक्तपणे करावयाची आहे, असे मा.सभापती यांनी निर्देश दिले.

सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी संक्रमण शिबीरामधील घुसखोरी काढून टाकणे या कामासाठी प्रतिनियुक्तीवर ८ पोलीस अधिका-यांची नेमणूक करण्यात यावी, असा मागिल बैठकीत निर्णय घेतला होता, त्या बाबत काय झाले अशी विचारणा केली असता, त्याबाबत मुख्य अधिकारी यंनी असे सांगितले की, यावर शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे व त्याचा पाठपुरावा सुरु आहे. सन्मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी धोकादायक उपकरप्राप्त इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून विमा उतरविण्याबाबत काय प्रगती झाली अशी विचारणा केली असता, मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, यासंदर्भात काही विमा कंपन्यांसोबत चर्चा झालेली असून, त्यांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. अद्याप त्यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत.

मा.सभापती यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की, मंडळामार्फत उमरखाडी येथील राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत पुनर्रचित केलेल्या इमारतींना अंदाजे २५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असून तेथील रहिवाशांची सदर इमारती तोडून पुनर्विकास करण्याची मागणी आहे व सदर इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव "पायलट प्रोजेक्ट" म्हणून शासनाकडे मंजूरीकरीता पाठविण्यात आलेला होता. परंतु शासनाने अलिकडेच ०२/०३/०९ रोजी विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) अंतर्गत "अर्बन

रिनिव्हल स्कीमला" मंजूरी देवून अधिसूचना जारी केलेली आहे व सदर अधिसूचनेमधील तरतुदीनुसार "म्हाडा प्रॉपर्टी ४,००० चौ.मी.पेक्षा कमी असेलतर संयुक्त पुनर्विकासामध्ये घेण्याची तरतूद आहे, म्हणून नवीन विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) नुसार उमरखाडी येथील पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजूरी देणे शक्य होणार नाही. या प्रस्तावास विशेष बाब म्हणून शासनाने मंजूरी देण्याच्यासंदर्भात प्रथम या विषयावर व मंडळाच्या संदर्भात असलेल्या अजून इतर विषयांवर चर्चा घडवून आणून शासनाने निर्णय घेण्याच्यादृष्टीने मा.मुख्य अधिकारी यांचेसोबत बैठकीकरीता वेळ निश्चित करण्यात येईल. सदर बैठकीस सन्मा.सदस्यांना देखील आमंत्रित करण्यात येईल, असे मा.सभापती यांनी सूचित केले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंडळाच्या दि.१७/०२/२००९ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीमधील कार्यवृत्तांतवरील पृष्ठ क्र.१२ वरती शेवटून तिस-या परिच्छेदामध्ये "अ" विभाग ऐवजी "डी-२" विभाग असा बदल करण्यात यावा, असे सूचविले. मंडळाच्या दि.१७/२/०९ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीमध्ये बाब क्र.११५.४ (क) अंतर्गत १०-१०ए झावबावाडी या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्याकरीता उपमुख्य अभियंता (द.) यांनी सुरुवातीस एकूण अंदाजपत्रकाची रक्कम रु.५,५०,००३.०० व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,२०,००३.०० इतके प्रस्तावित केले होते, परंतु त्यामध्ये सुधारणा करुन उपमुख्य अभियंता (द.) यांनी सदर कामावर सुधारित प्रशासकीय मंजूरीच्या अंदाजपत्रकांना एकूण रक्कम रु.१०,८८,९०८/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.५,३८,९०४/- असा बदल केलेला आहे. सदर बदल करुन प्रशासकीय मंजूरी देण्याचे बैठकीत ठरले.

तसेच मंडळाच्या दि.१७/२/०९ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीमध्ये बाब क्र.११५.४ (ड) अंतर्गत ९-११ विठोबा लेन या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्याकरीता उपमुख्य अभियंता (द.) यांनी सुरुवातीस एकूण अंदाजपत्रकाची रक्कम रु.२०,३५,१९२.०० व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१५,१९,९६९.०० इतके प्रस्तावित केले होते, परंतु त्यामध्ये सुधारणा करुन उपमुख्य अभियंता (द.) यांनी सदर कामावर सुधारित प्रशासकीय मंजूरीच्या अंदाजपत्रकांना एकूण रक्कम रु.२१,९६,६९८/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१४,८१,४७५/- असा बदल केलेला आहे. सदर बदल करुन प्रशासकीय मंजूरी देण्याचे बैठकीत ठरले.

तसेच मंडळाच्या दि.१७/२/०९ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीमध्ये बाब क्र.११५.४ (ब) अंतर्गत १५४-१५६ संतसेना महाराज मार्ग या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्याकरीता उपमुख्य अभियंता (द.) यांनी सुरुवातीस एकूण अंदाजपत्रकाची रक्कम रु.५,९०,३०८.०० व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४,३८,२०८.०० इतके प्रस्तावित केले होते, परंतु त्यामध्ये सुधारणा करुन उपमुख्य अभियंता (द.) यांनी सदर कामावर सुधारित प्रशासकीय मंजूरीच्या अंदाजपत्रकांना एकूण रक्कम रु.९,८६,३०९/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.५,१४,७०९/- असा बदल केलेला आहे. सदर बदल करुन प्रशासकीय मंजूरी देण्याचे बैठकीत ठरले.

तसेच मंडळाच्या दि.१७/२/०९ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीमध्ये बाब क्र.११५.४ (क) अंतर्गत ६५३ जे.एस.एस.रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्याकरीता उपमुख्य अभियंता (द.) यांनी सुरुवातीस एकूण अंदाजपत्रकाची रक्कम रु.१३,४८,०२१.०० व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.७,८१,६३८.०० इतके प्रस्तावित केले होते, परंतु त्यामध्ये सुधारणा करुन उपमुख्य अभियंता (द.) यांनी सदर कामावर सुधारित प्रशासकीय मंजूरीच्या अंदाजपत्रकांना एकूण रक्कम

रु.११,०७,६२४/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.८,४१,०२१/- असा बदल केलेला आहे. सदर बदल करुन प्रशासकीय मंजूरी देण्याचे बैठकीत ठरले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चेअंती दि.१७/२/०९ रोजी दुपारी २.०० वाजता झालेली ११४ वी अर्थसंकल्पीय बैठक व दुपारी ४.०० वाजता झालेली ११५ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - ११६.२**

विषय - २६ मार्च व २७ एप्रिल २००९ हया महिन्यात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना समितीच्या झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तांत अवलोकनार्थ व कार्योत्तर मंजूरीसाठी.

लोकसभा निवडणूक घोषित झाल्याने दि.०२/०३/०९ पासून देशभरात आचारसंहिता लागू झाल्याने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची बैठक होणार नसल्याने विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत येणा-या विकासाच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी म्हाड अधिनियमातील कलम ८३ (३) (अ) अंतर्गत उपकरप्राप्त इमारती घोषित करणे, मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या तातडीच्या दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यता देणे इ.बाबींवर निर्णय घेता यावा याकरीता मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांनी ४ सदस्यांची समिती स्थापन करुन या समितीच्या बैठकीमध्ये वर नमूद केलेल्या विषयांबाबत निर्णय घेण्याची परवानगी दिली. सदर समितीमध्ये पुढील सदस्यांची नेमणूक करण्यात आली होती.

१. मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ
२. मुख्य अभियंता-२/प्रा.
३. उपमुख्य अभियंता/इमारत प्रस्ताव/म.न.पा.
४. निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु.

सदर समितीच्या दि.२६/०३/०९ व दि.२७/०४/०९ अशा दोन बैठका झाल्या. सदर बैठकीस मंडळाचे सदस्य उपसचिव/गृहनिर्माण विभाग,मंत्रालय यांना विशेष निमंत्रीत करण्यात आलेले होते. सदर बैठकांमध्ये विविध विषयांवर झालेली चर्चा व ठराव या बाबतचा कार्यवृत्तांत मंडळाच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ व कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आला.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होत असताना सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी या दोन्ही बैठकांची कार्यसूची माहितीसाठी देण्यात यावी, अशी विनंती केली व त्यानुसार मा.मुख्य अधिकारी यांनी सन्मा.सदस्यांना दोन्ही बैठकांच्या कार्यसूचीच्या प्रती देण्यात याव्यात अशा सूचना दिल्या. सदर दोन्ही बैठकांच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा झाली व कार्यवृत्तांतास सर्वानुमते बैठकीमध्ये कार्योत्तर मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.३**

विषय - मुंबई शहर बेटावरील अतिधोकादायक इमारती सन २००९ ची यादी अवलोकनार्थ.

मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींचे दरवर्षी पावसाळापूर्व सर्वेक्षण करण्यात येवून सर्वेक्षणाअंती अतिधोकादाय इमारती घोषित करण्यात येतात. सन-२००९ या वर्षात पावसाळापूर्व सर्वेक्षण करुन एकूण मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींपैकी एकूण ३५ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक आढळून आल्याचे घोषित करण्यात आलेले आहे. या इमारतींची विभागनिहाय यादी मंडळाच्या बैठकीमध्ये माहितीकरीता सादर करण्यात आली. सदर विषयावर चर्चा होत असताना, सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी इ.क्र.२८ जेल रोड या इमारतीमधील काही भाग अतिधोकादायक असून दुरुस्तीचे काम तात्काळ हाती घेण्यात यावे अशी सूचना केली. या संदर्भात सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी सदर इमारतीच्या दुरुस्तीकरीता लागणारा आवश्यक असलेला अतिरिक्त निधी त्यांच्या आमदार निधीतून देणार आहेत व सदर निधीतून इमारतीमधील अतिधोकादायक भाग सुरक्षित करण्याच्यादृष्टीने प्रथम प्राधान्याने दुरुस्तीचे काम घ्यावे असे सांगितले. या अनुषंगाने मा.सभापती यांनी सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम कार्यकारी अभियंता, फ-ग विभाग यांनी तात्काळ हाती घ्यावे, असे आदेश दिले.

वरील चर्चेअंती सन २००९ या वर्षामध्ये अतिधोकादायक घोषित केलेल्या इमारतींची बैठकीत नोंद घेण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.४**

विषय - विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत केलेली सुधारणा मंडळाच्या अवलोकनार्थ.

शासनाच्या नगर विकास विभागाने दि.०२/०३/०९ रोजी अधिसूचना काढून विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) मध्ये बदल करुन सुधारित तरतूदी लागू केल्या आहेत. या दोन्ही अधिसूचना व शासन निर्णयाच्या प्रती मंडळाच्या बैठकीमध्ये माहितीसाठी सादर करण्यात आल्या. या संदर्भात मा.मुख्य अधिकारी यांनी सदर शासन अधिसूचनेंतर्गत विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) या मधील शासनाने केलेल्या तरतूदीविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच सदर सुधारित तरतूदीनुसार काही बदल करणे आवश्यक असल्याने विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) यामध्ये आवश्यक असलेला बदल करण्याच्यादृष्टीने शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यात प्रामुख्याने मूळ विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) अंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत संपादित केलेल्या उपकरप्राप्त इमारतींची पुनर्रचना करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. सदर तरतूद शासनाने रद्द करुन नवीन विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) प्रस्तावाची अधिसूचना निर्गमित केलेली असल्यामुळे म्हाडामार्फत पुनर्रचना करण्याकरीता पूर्वीच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) मधील तरतूदी पुर्नप्रस्थापित करण्यासाठी तसेच नवीन विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) अंतर्गत ४००० चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या भूखंडांच्या प्रस्तावांची अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने गठित केलेल्या उच्च स्तरीय समितीच्या बैठकीत पुनर्रचना करण्यासाठी देखील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. तसेच म्हाड ॲक्टमधील उपकरप्राप्त इमारतींचे वर्गीकरण अ,ब,क हे कलम ८४ मधील तरतूदींत देखील बदल करुन सर्व उपकरप्राप्त इमारती एकाच वर्गात म्हणजे अ वर्गातच

वर्गीकरण करण्याकरीता तसेच विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) व सुधारित ३३ (९) व ३३ (७) मध्ये काही सुधारणा, बदल करण्याकरीता सविस्तर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

वरील चर्चेअंती सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) व ३३ (७) मधील सुधारित तरतूदी लागू करुन दि.०२/०३/०९ च्या अधिसूचनेबाबत मंडळाच्या बैठकीत नोंद घेण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.५**

विषय - पुनर्रचना विभाग
इ.क्र.३८७-३८९ व ३९१ अे ते ई बदामवाडी व्ही.पी.रोड, डी विभाग
गिरगाव या इमारतीच्या पुनर्बांधणी कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.६७ ते ६९ वर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११६/९५८**

इ.क्र.३८७-३८९ व ३९१ अे ते ई बदामवाडी व्ही.पी.रोड, डी विभाग गिरगाव या इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या रु.३,६३,४८१,२५/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.६**

विषय - उपमुख्य अधिकारी/संक्रमण गाळे शैक्षणिक आरोग्यविषयक कार्य करणा-
या सामाजिक संस्थांना संक्रमण शिबीरात गाळे वितरणासंबंधी
धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांच्या स्तरावर मंडळाच्या सन्मा.सदस्यांचा अंतर्भाव करुन उपसमिती गठित करण्यात आली होती. सदर उपसमितीच्या दि.३०/०१/०९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये उपरोक्त विषयाबाबत निर्णय घेवून शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने सन्मा.सदस्य सर्वश्री.किसन जाधव, हेमराज शहा यांनी असे सूचित केले की, समितीने केलेल्या शिफारशीमधील काही मुद्दयांवर सुधारणा करुन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसे न करता समितीने केलेल्या शिफारशींनुसार या प्रस्तावावर मान्यता देण्यात यावी. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे बदल करुन मंजूरी देण्याचे ठरले.

१) वाटपाच्या अटी व शर्तीमध्ये अनुक्रमांक ५ मध्ये प्रती चौ.फूट रु.५/- या प्रमाणे दरमहा भाडेऐवजी प्रती चौ.फूट रु.३/- याप्रमाणे दरमहा भाडे.

२) वाटपाच्या अनुक्रमांक ६ मध्ये संक्रमण शिबीरातील असलेल्या गाळ्यांच्या संख्येच्या २% किंवा १० गाळे याऐवजी २% किंवा २० गाळे.

वरीलप्रमाणे बदल करुन प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे मान्य केले व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक - ११६/९५९**

धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावामध्ये वरीलप्रमाणे बदल करुन प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) वाटपाच्या अटी व शर्तीमध्ये अनुक्रमांक ५ मध्ये प्रती चौ.फूट रु.५/- या प्रमाणे दरमहा भाडेऐवजी प्रती चौ.फूट रु.३/- याप्रमाणे दरमहा भाडे.

२) वाटपाच्या अनुक्रमांक ६ मध्ये संक्रमण शिबीरातील असलेल्या गाळयांच्या संख्येच्या २% किंवा १० गाळे याऐवजी २% किंवा २० गाळे.

**बाब क्रमांक - ११६.७**

विषय - उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८१ ते ९५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परिमंडळातील ९५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१६,६५,०९,७४६/- एवढया रक्कमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.९,९६,२५,६२७/- प्रशासकीय मान्यता देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक - ११६/९६०**

उत्तर परिमंडळातील एकूण ९५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मूळ/सुधारित अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

**बाब क्रमांक - ११६.८**

विषय - दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.९७ ते १२३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत. उपमुख्य अभियंता (द.) यांनी बैठकीमध्ये दिलेल्या सुधारित प्रस्तावानुसार दक्षिण परिमंडळातील २५४ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.४६,९५,८७,५७५.३० एवढया रक्कमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२५,४७,१७,३१९.३० प्रशासकीय मान्यता देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११६/१६०**

दक्षिण परिमंडळातील एकूण २५४ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मूळ/सुधारित अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.९**

विषय - भूकर पाहणी १११७ लोअर परेल विभाग न्यु प्रभादेवी रोड वाकडी चाळ म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेचा पुनर्विकास योजनेबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मुख्य अधिकारी यांनी सुनावणी घेऊन पारित केलेले आदेश मंडळाच्या माहितीकरीता.

सदर विषयावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. सन्मा.सदस्य श्री.शिरीषकर व सन्मा.सदस्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी वाकडी चाळ ही इमारत धोकादायक असून सदर मालमत्तेच्या पुनर्विकास योजनेस ना हरकत प्रमाणपत्र का दिले नाही अशी विचारणा केली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुख्य अधिकारी यांनी संबंधितांची सुनावणी घेवून सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतले व दि.२२/०२/०९ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशामध्ये विकासकाकडे सध्या ७०% रहिवाश्यांचे अपरिवर्तनीय सम्मतीपत्रे नसल्यामुळे ना हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही, असे नमूद केले आहे. तसेच अर्जदार जर पुन्हा नव्याने ७०% रहिवाश्यांचे अपरिवर्तनीय सम्मतीपत्र सादर केल्यास मंडळातर्फे ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा विचार केला जाईल, असे आदेश दिले.

या संदर्भात मा.सभापती यांनी असे सूचित केले की, संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सदर उपकरप्राप्त इमारतींची पहाणी करावी. इमारत धोकादायक असल्यास धोकादायक भाग सुरक्षित करुन आवश्यक ती उपाययोजना करावी.

बैठकीत सादर करण्यात आलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.१०**

विषय - भूकर पहाणी क्र.८१, मांडवी विभाग, इ.क्र.२४२-२४६, नागदेवी स्ट्रीट, बी वॉर्ड, संयुक्त पुनर्विकास योजनेचा विकासक मे.रबरवाला डेव्हलपर्स प्रा.लि. यांना काम थांबविण्याचे दिलेले पत्र रद्द करुन याबाबत मुंबई महानगरपालिकेने गुणवत्तेवर निर्णय घेणेबाबत कळविणे.

सदर विषयावर चर्चा होत असताना, मा.सभपती यांनी सदर पुनर्विकास योजनेच्याशेजारी उपकरप्राप्त इमारत सय्यद हाऊस दि.१२/११/२००८ रोजी कोसळून अपघात घडला होता. सदर अपघातात ६ व्यक्ती मृत झाल्या होत्या. त्या इमारतीमधील रहिवाशी/भाडेकरु यांनी या बाबत अनेकवेळा तक्रारी केलेल्या आहेत. त्यांना विश्वासात घेवून सदर प्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश दिले.

**बाब क्रमांक - ११६.१०अ**

विषय - भूकर पहाणी क्र.३/१६.३४ भायखळा विभाग,इ.क्र.३०, मोतलीबाई स्ट्रीट या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी असे नमूद केले की, सदर इमारत महानगरपालिकेने कलम ३५४ अंतर्गत नोटीस देवून सदर इमारत धोकादायक आहे असे घोषित केले आहे. सदर इमारतीस मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मंजूरी दिलेली आहे. ७०% रहिवाश्यांनी ना हरकत प्रमाणपत्रासाठी सम्मती दिलेली आहे. ज्यांनी सम्मती दिलेली आहे, अश्यांची सुनावणी घेण्याचे सूचति केले. सदर प्रकरणी विकासकाविरुध्द केलेल्या कार्यवाहीबाबत मुख्य अधिकारी यांनी सभागृहास सविस्तर माहिती दिली. सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सदर प्रकरणी वस्तुस्थिती दर्शविणारा प्रस्ताव मंडळासमोर सादर केला असून सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. यामध्ये काहीही गैर नसून मंडळाने यावर बैठकीमध्ये एकमताने निर्णय घ्यावा, असे सूचित केले. या संदर्भात मा.सभापती यांनी मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र देताना ७०% रहिवाश्यांनी सम्मती दिलेली असल्यामुळे ना हरकत प्रमाणपत्रास मंजूरी दिलेली आहे. ३०% रहिवाशी विरोध करतात. या सर्व भाडेकरु/रहिवाश्यांची व विकासकाची एकत्रित सुनावणी घ्यावी व वस्तुस्थिती जाणून घेवून मुख्य अधिकारी यांनी यावर योग्य तो निर्णय घ्यावा असे सूचित केले. त्यास सर्वांनी अनुमती दिली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक - ११६/९६१**

भूकर पहाणी क्र.३/१६.३४, भायखळा विभाग, इ.क्र.३०, मोतलीबाई स्ट्रीट, उपकर क्र.४१४६ (३) या इमारतीच्या पुनर्विकास योजनेच्या प्रकरणात बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की, मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व भाडेकरु/रहिवाशी व विकासक यांची एकत्रित सुनावणी करुन योग्य तो निर्णय घ्यावा, असे सर्वानुमते ठरले.

**बाब क्रमांक - ११६.११**

विषय - विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

१. मा.आमदार श्री.सचिन अहिर यांचा शिवडी मतदार संघ (दुरुस्तीसाठी)
मा.आमदार श्री.सचिन अहिर यांचा शिवडी मतदार संघ (पुनर्रचित इमारत दुरुस्तीसाठी)
२. मा.आमदार श्रीमती ॲनी शेखर यांचा कुलाबा मतदार संघ
३. मा.आमदार श्री.राज के.पुरोहीत यांचा मुंबादेवी मतदार संघ
४. मा.आमदार श्री.बाळा नांदगावकर यांचा माझगाव मतदार संघ
५. मा.आमदार श्री.अरुण गवळी यांचा चिंचपोकळी मतदार संघ
६. मा.आमदार श्री.बशिर मुसा पटेल यांचा उमरखाडी मतदार संघ
७. मा.आमदार श्री.कालीदास कोळंबकर यांचा नायगाव मतदार संघ
८. मा.आमदार श्री.सय्यद अहमद यांचा नागपाडा मतदार संघ

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१२९ ते १६३ वर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा.आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीस अधीन राहून (प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक - ११६/९६२

विशेष निधी अंतर्गत मा.आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीस अधीन राहून (प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.१२**

विषय - पुनर्विकास
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. भूकर पाहणी क्र.१८१, टीपीएस-३, माहिम विभाग गांधी भवन

२. भूकर पाहणी क्र.८१९/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१५२/ए दादर पीरोज पॅलेस

३. भूकर पाहणी क्र.१७-सी/१०, माटुंगा विभाग, आर.पी.मसानी मार्ग, माटुंगा, मुंबई-४०० ०१९, "गोल्ड फीन्च"

४. भूकर पाहणी क्र.२१६ लोअर परेल विभाग, इ.क्र.६४-६६-६८,मुंबई-१३"गोहिल सदन"

५. भूकर पाहणी क्र.७८२/१०, माटुंगा विभाग, विन्सेंट रोड,मुंबई-१९,श्री राम भवन

६. भूकर पाहणी क्र.१९८५, भायखळा विभाग,इ.क्र.६००-६०४,बि.जे.मार्ग,भायखळा

७. भूकर पाहणी क्र.६/१२४, माझगाव विभाग,इ.क्र.३३ एफ २ डीडी,माझगाव रोड मुंबई

८. भूकर पाहणी क्र.२३०० भूलेश्वर विभाग, परमानंद वाडी, ठाकूरद्वार रोड व बाबासाहेब जयकर मार्ग, मुंबई.

९. भूकर पाहणी क्र.२०० ताडदेव विभाग,इ.क्र.२९१ ए बाप्टी रोड व इ.क्र.३,५,७,९ व ११ अरबलेन, "रुसी मेहता चाळ" मुंबई.

१०. भूकर पाहणी क्र.३/१९० ताडदेव विभाग,इ.क्र.३२२ बी, मौलाना शौकत अली रोड, ग्रॅन्ट रोड,"जॉर्ज बिल्डींग" मुंबई.

११. अंतिम भूखंड क्र.२१७-टीपीएस ४,माहिम विभाग, इ.क्र.३१-३१सी-५३-५३-आय व ३३ गोखले रोड व रानडे रोड,दादर (प.), मुंबई-२८,आर.के.बिल्डींग क्र.१ व २

१२. भूकर पाहणी क्र.११९१,१/११९१,२/११९१,११९२,१/११९२,११९३ व ११९४ गिरगाव विभाग, एम.एस.अली रोड, ग्रॅन्ट रोड, "शितलइस्टेट" मुंबई

१३. भूकर पाहणी क्र.१५५१ गिरगाव विभाग, इ.क्र.७६, एच.जी.रोड. "व्हिक्टोरिया मील चाळ" मुंबई.

१४. भूकर पाहणी क्र.१७१२ भायखळा विभाग, इ.क्र.३१, दुसरी घेलाभाई मार्ग.

१५. भूकर पहाणी क्र.९०१ व २/९०१, लोअर परेल विभाग, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - १३, दादाभाई चाळ क्र.१,२,३ ह्या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत.

१६. भूकर पहाणी क्र.४३४, गिरगाव विभाग,इ.क्र.५, शेनवी वाडी, नवाकाळ पथ, प्रशांत को.ऑप.हौ.सो.लि.मुंबई-०४ ह्या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत.

सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील अनु.क्र.६ वरील पुनर्विकासाचा प्रस्ताव पुनश्च टंकलिखित झाल्यामुळे तो रद्द करुन अनु.क्र.७ व ८ यांना अनु.क्र.६ व ७ असा बदल करण्यास बैठकीत विनंती करण्यात आली. तसेच मा.अध्यक्षांच्या मान्यतेने आयत्यावेळी ठेवावयाचे विषयातील बाब क्रमांक ११६.१२ मधील अनु.क्र.९ ते १७ ऐवजी अनु.क्र.८ ते १६ असा बदल करण्यास बैठकीत विनंती करण्यात आली.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१६५ ते २२५ ड वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांपैकी वरील अ.क्र.१३ वरील प्रस्ताव वगळून उर्वरित प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व अ.क्र.१३ वरील ना हरकत प्रमाणपत्राचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला आहे.

**ठराव क्रमांक - ११६/९६३**

मुंबई बेटावरील खालील १५ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी व प्रस्तावाच्या यादीतील अ.क्र.१३ वरील प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला.

१. भूकर पाहणी क्र.१८१, टीपीएस-३, माहिम विभाग गांधी भवन

२. भूकर पाहणी क्र.८१९/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१५२/ए दादर पीरोज पॅलेस

३. भूकर पाहणी क्र.१७-सी/१०, माटुंगा विभाग, आर.पी.मसानी मार्ग, माटुंगा, मुंबई-४०० ०१९, "गोल्ड फीन्च"

४. भूकर पाहणी क्र.२१६ लोअर परेल विभाग, इ.क्र.६४-६६-६८, मुंबई-१३"गोहिल सदन"

५. भूकर पाहणी क्र.७८२/१०, माटुंगा विभाग, विन्सेंट रोड,मुंबई-१९,श्री राम भवन

६. भूकर पाहणी क्र.१९८५, भायखळा विभाग,इ.क्र.६००-६०४,बि.जे.मार्ग,भायखळा

७. भूकर पाहणी क्र.६/१२४, माझगाव विभाग,इ.क्र.३३ एफ २ डीडी,माझगाव रोड मुंबई

८. भूकर पाहणी क्र.२३०० भूलेश्वर विभाग, परमानंद वाडी, ठाकूरद्वार रोड व बाबासाहेब जयकर मार्ग, मुंबई.

९. भूकर पाहणी क्र.२०० ताडदेव विभाग,इ.क्र.२९१ ए बाप्टी रोड व इ.क्र.३,५,७,९ व ११ अरबलेन, "रुसी मेहता चाळ" मुंबई.

१०. भूकर पाहणी क्र.३/१९० ताडदेव विभाग,इ.क्र.३२२ बी, मौलाना शौकत अली रोड, ग्रॅन्ट रोड,"जॉर्ज बिल्डींग" मुंबई.

११. अंतिम भूखंड क्र.२१७-टीपीएस ४,माहिम विभाग, इ.क्र.३१-३१सी-५३-५३-आय व ३३ गोखले रोड व रानडे रोड,दादर (प.), मुंबई-२८,आर.के.बिल्डींग क्र.१ व २

१२. भूकर पाहणी क्र.११९१,१/११९१,२/११९१,११९२,१/११९२,११९३ व ११९४ गिरगाव विभाग, एम.एस.अली रोड, ग्रॅन्ट रोड, "शितलइस्टेट" मुंबई

१४. भूकर पाहणी क्र.१७१२ भायखळा विभाग, इ.क्र.३१, दुसरी घेलाभाई मार्ग.

१५. भूकर पहाणी क्र.९०१ व २/९०१, लोअर परेल विभाग, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - १३, दादाभाई चाळ क्र.१,२,३ हया मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत.

१६. भूकर पहाणी क्र.४३४, गिरगाव विभाग,इ.क्र.५, शेनवी वाडी, नवाकाळ पथ, प्रशांत को.ऑप.हौ.सो.लि.मुंबई-०४ हया मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत.

<u>मा.अध्यक्षांच्या मान्यतेने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय</u>

**बाब क्रमांक - ११६.१३ (१)**

विषय - संक्रमण शिबीरे पुनर्रचित इमारती व ना हरकत प्रमाणपत्र संबंधातील उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु/रहिवाश्यांचे फोटोग्राफ बायोमेट्रीक्सचा उपयोग करुन डेटाबेस तयार करण्याबाबत सॉफ्टवेअर विकसीत करणे व अंमलबजावणीसाठी निविदा मागविणेबाबत.

सदर विषयावरती सविस्तर चर्चा झाली व सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देवून खालीलप्रमाणे ठराव सम्मत झाला.

**ठराव क्रमांक -११६/९६४**

पृष्ठ क्र.२२७ ते २३१ वर सादर करण्यात आलेला प्रस्ताव बैठकीमध्ये सादर करण्यात आला. सदर प्रस्तावावर चर्चा होवून बैठकीमध्ये प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - ११६.१३ (२)**

विषय - इ.क्र.अे.आर.पी.बिल्डींग १,२ व ३ नौशीर भरुचा मार्ग, डी विभाग, सी.एस.क्र.१/२७८ नवीन चिखलवाडी ताडदेव पुनर्रचनेबाबत सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे नमूद केले की, त्यातील भाडेकरु/रहिवाशी क्लस्टर पध्दतीने पुनर्विकास करावा अशी मागणी करीत आहेत व सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) मध्ये काही बदल सुचवून शासनाकडे प्रस्ताव पाठविला असल्यामुळे शासन स्तरावर त्या बाबत निर्णय होईपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**बाब क्रमांक - ११६.१३ (३)**

विषय - बहुमजली पुनर्रचित इमारतींची उद्वाहने (Lift) बदलविण्याची कामे मंडळाच्या निधीतून करणेबाबत.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. सदर विषयावर सखोल चर्चा करणे आवश्यक असल्यामुळे हा विषय पुढील बैठकीत पुन्हा सादर करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**बाब क्रमांक - ११६.१४**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीतील रिक्त असलेले निवासी/अनिवासी गाळे खुल्या बाजारात विक्री करण्याबाबत.

सदर विषयावर उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी बैठकीत सविस्तर माहिती दिली. सदर विषयाच्या अनुषंगाने मंडळाच्या दि.-26/08/2008 रोजी झालेल्या बैठकीमध्ये सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमण्यात आली होती. उपसमितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे उपलब्ध असलेले गाळे वाटपाच्या कार्यपध्दतीबाबत शिफारस केली होती. या अनुषंगाने प्रस्ताव बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये गाळे वाटपाच्या कार्यपध्दतीमध्ये अनु क्र.४ मधील "एकाच प्राधान्यक्रमात एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास चिठ्ठया टाकून गाळयांचे वाटप करावे." या ऐवजी "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" (First come First) वरती वाटप करावे, असा बदल करुन पृष्ठ क्र.२३७ ते २४३ वर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव सम्मत करण्यात आला.

**ठराव क्रमांक - ११६/९६५**

पृष्ठ क्र.२३७ ते २४३ वर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास बैठकीत सर्वानुमते मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - ११६.१५**

विषय - दक्षिण परिमंडळातील दुरुस्तीच्या कामाच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.२४५ ते २६१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील ६१ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१२,२४,५६,७१२.०० एवढया रक्कमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६,६१,८९,६०४.०० प्रशासकीय मान्यता देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक - ११६/९६६**

दक्षिण परिमंडळातील एकूण ६१ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मूळ/सुधारित अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

**बाब क्रमांक - ११६.१६**

विषय - दक्षिण परिमंडळातील खालील उपकरप्राप्त इमारतींना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- प्रती चौ.मी.लागू करण्यास मंजूरी मिळणेबाबत.

(१) इ.क्र.१६५-१६७ राजा राम मोहन राय मार्ग या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
(२) इ.क्र.३१६-३१८ बी, एम.एस.अली रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
(३) इ.क्र.२६ अे, लाला निगम रोड,या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

**ठराव क्रमांक - ११६/९६७**

दक्षिण परिमंडळातील खालील उपकरप्राप्त इमारतींना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- प्रती चौ.मी.लागू करण्यास बैठकीत सर्वानुमते मंजूरी दिली.

(१) इ.क्र.१६५-१६७ राजा राम मोहन राय मार्ग या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
(२) इ.क्र.३१६-३१८ बी, एम.एस.अली रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
(३) इ.क्र.२६ अे, लाला निगम रोड,या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिका-यांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव

मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.सभापती, मुं.इ.दु.व पु.मंडळ